# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२०

**क्रमांक :एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन** **जाहिरात क्रमांक : ०५/२०२०**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील एकूण ८०६ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा – २०२०, **रविवार, दिनांक ३ मे, २०२० रोजी महाराष्ट्रातील एकूण ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल** :-

| **१.१ सामान्य प्रशासन विभाग :-** | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ६७ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **सा. व शै. मागासवर्ग** | **आ.दु.घ.** | **एकूण मागासवर्गीय** | **खुला** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ११ | ५ | -- | २ | १ | २ | १२ | ३ | ९ | ७ | ५२ | १५ | ६७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ७ | ४ | -- | १ | १ | १ | ७ | २ | ६ | ५ | ३४ | १० | ४४ |
| महिला | ३ | १ | -- | १ | -- | १ | ४ | १ | ३ | २ | १६ | ४ | २० |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| दिव्यांग | एकूण पदे ३ - (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-२ (२) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१ | | | | | | | | | | | | |
| **१.२ वित्त विभाग :-** | | | | | | | | | | | | | |
| **राज्य कर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ८९ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १३ | ६ | १ | १ | ६ | १ | १६ | -- | ११ | ९ | ६४ | २५ | ८९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ८ | ४ | १ | १ | ४ | १ | १० | -- | ७ | ६ | ४२ | १५ | ५७ |
| महिला | ४ | २ | -- | -- | २ | -- | ५ | -- | ३ | ३ | १९ | ८ | २७ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| दिव्यांग | एकूण पदे ४ - (१) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-२ (२) श्रवण शक्तीतील दोष-१ (३) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१ | | | | | | | | | | | | |
| **१.३ गृह विभाग :-** | | | | | | | | | | | | | |
| **पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एकूण ६५० पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ८५ | २४ | २०+९* | १६+१४* | २ | -- | १२४+१८* | १३ | ८५ | ६५ | ४७५ | १७५ | ६५० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५६ | १६ | १९ | १९ | १ | -- | ९२ | ८ | ५६ | ४३ | ३१० | १०७ | ४१७ |
| महिला | २५ | ७ | ९ | ९ | १ | -- | ४३ | ४ | २५ | १९ | १४२ | ५३ | १९५ |
| खेळाडू | ४ | १ | १ | २ | -- | -- | ७ | १ | ४ | ३ | २३ | ९ | ३२ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६ | ६ |
| *** अनुशेषाची पदे** | | | | | | | | | | | | | |

**२. पात्रतेचे निकष :-**

**२.१** भारतीय नागरिकत्व

**२.२ वयोमर्यादा :-**

| **अ. क्र.** | **संवर्ग** | **वयोमर्यादा गणण्याचा दिनांक** | **वय** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **किमान** | **कमाल** | | **प्राविण्य प्राप्त खेळाडू** | | **माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी** | | **दिव्यांग उमेदवार** |
| | | | **अमागास / मागासवर्गीय** | **अमागास** | **मागासवर्गीय / अनाथ** | **अमागास** | **मागासवर्गीय/ अनाथ** | **अमागास** | **मागासवर्गीय/ अनाथ** | |
| १ | सहायक कक्ष अधिकारी | १ जून, २०२० | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | राज्य कर निरीक्षक | १ मे, २०२० | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | १ जून, २०२० | १९ | ३१ | ३४ | ३६ | ३६ | ३६ | ३६ | अपात्र |

**२.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**२.४ शैक्षणिक अर्हता :-**

**२.४.१** सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असणारी शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही तत्सम अर्हता.

**२.४.२** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत संयुक्त पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**२.४.३** अंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहीजे.

**२.४.४** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**२.४.५ पोलीस उपनिरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणा-या उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे :-**

| पुरुष | महिला |
|---|---|
| (१) उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**२.४.६** पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारिरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**३. परीक्षेचे टप्पे -**

**३.१** विविध संवर्गाकरीता भरती प्रक्रिया खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या टप्प्यामध्ये राबविण्यात येईल :-

| अ.क्र. | संवर्ग | टप्पे | संयुक्त पूर्व परीक्षेचे गुण | मुख्य परीक्षेचे गुण | शारीरिक चाचणीचे गुण | मुलाखतीचे गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहायक कक्ष अधिकारी | संयुक्त पूर्व परीक्षा व स्वतंत्र मुख्य परीक्षा | १०० | २०० | -- | -- |
| २ | राज्य कर निरीक्षक | | | | | |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | संयुक्त पूर्व परीक्षा, स्वतंत्र मुख्य परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखत | | | १०० | ४० |

**३.२ संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करणा-या उमेदवारांना, ते वरीलपैकी एक, दोन किंवा तीनही संवर्गासाठी बसू इच्छितात किंवा कसे याबाबत विकल्प (Option) द्यावा लागेल.**

**३.३ संबंधित संवर्गाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधीत संवर्ग भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.**

**३.४** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेच्या आधारे तीनही संवर्गाकरीता पूर्व परीक्षेचा स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**३.५** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची संबंधित संवर्गाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल. संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी प्रत्येक संवर्गाकरीता मुख्य परीक्षेसाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

**३.६** मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे संबंधित संवर्गाच्या परीक्षा योजनेनुसार, निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. पूर्व परीक्षा केवळ मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी घेतली जात असल्याने पूर्व परीक्षेतील गुण निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

**३.७** पोलीस उप निरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**३.८** मुलाखत अथवा कागदपत्रे पडताळणीसाठी आमंत्रित केल्यानंतर पात्रतेसंदर्भातील सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या अथवा प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर न केल्यास मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच, शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

**३.९** विषयांकित संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाधारे वेगवेगळया संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता स्वतंत्र मुख्य परीक्षा खालील दिनांकास किंवा त्यानंतर आयोजित होण्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | परीक्षा | वार व दिनांक |
|---|---|---|
| | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०१९ संयुक्त पेपर क्रमांक १ | रविवार, दिनांक ६ सप्टेंबर, २०२० |
| १ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०१९ पेपर क्रमांक २<br>पोलीस उप निरीक्षक | रविवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०२० |
| २ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०१९ पेपर क्रमांक २<br>राज्य कर निरीक्षक | रविवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२० |
| ३ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - २०१९ पेपर क्रमांक २<br>सहायक कक्ष अधिकारी | रविवार दिनांक ४ ऑक्टोबर, २०२० |

**३.१०** तीन संवर्गासाठी आयोजित महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक १ हा सामाईक राहील. तसेच सदर पेपरची परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येईल. मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक २ मात्र संबंधित संवर्गाची/पदाची कर्तव्ये व जबाबदा-या आणि अभ्यासक्रम लक्षात घेवून स्वतंत्र असेल.

**३.११** मुख्य परीक्षेच्या परीक्षा योजनेमध्ये तसेच पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीच्या गुणदान पध्दतीमध्ये बदल/सुधारणा होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे घोषणा प्रसिध्द करण्यात येईल.

## ४. पूर्व परीक्षेकरीता अर्ज करण्याची पद्धत :-

**४.१** अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**४.२** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**४.३** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**४.४** आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**४.५** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mahampsc.mahaonline.gov.in

**४.६ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

(१) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापुर्वी विहित पध्दतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करुन खाते (Profile) तयार करणे.

(२) खाते तयार केलेले असल्यास व ते अदययावत करण्याची आवश्यकता असल्यास अदययावत करणे.

(३) विहित कालावधीत व विहित पध्दतीने अर्ज सादर करणे.

(४) परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**४.७** अर्ज सादर करण्याकरीता कालावधी :- **दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० ते १९ मार्च, २०२० रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**४.८** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**४.९ शुल्क रुपये :**

४.९.१ अमागास - ३७४/-

४.९.२ मागासवर्गीय व अनाथ - २७४/-

४.९.३ उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस अतिरिक्त राहतील.

४.९.४ परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

**४.१०** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

**४.१०.१** शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक करावे.

**४.१०.२** '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर '**माझे अप्लिकेशन**' सदरातील '**स्पर्धात्मक परीक्षा**'या लिंक वर क्लिक करावे.

**४.१०.३** '**स्पर्धात्मक परीक्षा**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. '**Unpaid**' लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर ' **Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

**४.१०.४** '**Pay Now**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील :- (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

**४.१०.५** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**४.१०.६** नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

**४.१०.७** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**४.१०.८** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.१०.९** ऑनलाईन परीक्षा शुल्क भ**रणे** तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित **अंतिम दिनांक :- १९ मार्च, २०२० रोजी २३.५९ वाजेपर्यंत**.

**४.१०.१०** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक :- २० मार्च, २०२०** - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

**४.१०.११** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**४.१०.१२** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**४.११ जिल्हा केंद्र निवड :-**

**४.११.१** अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**४.११.२** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**४.११.३** एखादया जिल्हा केंद्रावर शाळा/महाविदयालयाच्या क्षमतेपेक्षा अधिक उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाल्यास अथवा संबंधित जिल्हा केंद्र कार्यान्वित होवू न शकल्यास अथवा इतर प्रशासकीय कारणास्तव उमेदवाराने अर्ज सादर करताना निवडलेल्या जिल्हा केंद्राव्यतिरिक्त आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार अन्य जिल्हा केंद्रावर उमेदवाराच्या प्रवेशाची व्यवस्था करण्यात येईल.

## ५. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

**५.१ सर्वसाधारण :-**

**५.१.१** **वेतनश्रेणी** - एस-१४ रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते

**५.१.२** पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल. तसेच याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या

संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**५.१.३** पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

**५.१.४** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**५.१.५** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरीता ग्राहय धरण्यात येतील.

**५.१.६** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**५.१.७** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

**५.१.८** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**५.१.९** अराखीव (खुला) पदाकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**५.१.१०** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणेनुसार राबविण्यात येईल :-

(१) सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम २०१८

(२) राज्य कर निरीक्षक, (विक्रीकर निरीक्षक) गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५

(३) पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५

**५.१.११** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक तसेच समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**५.१.१२** राज्य कर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील भरतीकरीता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**५.२ महिला आरक्षण :-**

महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**५.३ प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठीचे आरक्षण :-**

**५.३.१** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**५.३.२** प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

**५.३.३** खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूंच्या आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**५.३.४** कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**५.३.५** एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**५.४ दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण :-**

**५.४.१** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : कअस १३१५/प्र.क्र.१२०/१४-ब, दिनांक १६ एप्रिल, २०१६ तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण १०१२/प्र.क्र.२१३/वि.प्र. - ४, दिनांक ११ मार्च, २०१६ नुसार अंधत्व किंवा क्षीणदृष्टी, श्रवणशक्तीतील दोष व चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू या प्रकारच्या पात्रतेचे निकष धारण करणारे दिव्यांग उमेदवार गुणवत्तेनुसार सहायक कक्ष अधिकारी व राज्य कर निरीक्षक पदाकरीता शिफारशीसाठी पात्र असतील.

**५.४.२** शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक उसप्रे-०३९८/सीआर-४५७/भाग-२/पोल-५ अ, दिनांक १५ ऑक्टोबर, २००३ नुसार दिव्यांग उमेदवार पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता पात्र नाहीत.

**५.४.३** दिव्यांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.४.४** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**५.४.५** दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

**५.४.६** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**५.४.७** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**५.५ अनाथ व्यक्तींचे आरक्षण :-**

अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**५.६ समांतर आरक्षण :-**

**४.७.१** महिला, खेळाडू, तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाकडून यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**४.७.२** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**६. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

**६.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ च्या आधारे केंद्र शासनाकडून दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनादवारे विहित करण्यात आलेल्या पात्र दिव्यांग व्यक्तींची परीक्षा आयोजित करण्याकरीता मार्गदर्शक सूचना-२०१८ ( Guideline for conduct of written examination for Persons With Benchmark Disabilities- २०१८) च्या आधारे दिव्यांग व्यक्तींच्या परीक्षा आयोजनासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**६.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**६.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**६.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**६.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६.६** दिव्यांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना, विविध अर्जांचे नमुने, विशेष सूचना, संबंधित शासन आदेश इत्यादी बाबी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "विकलांग (दिव्यांग) व्यक्ती" या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, त्यांचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करावे.

**७. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**७.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**७.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**७.३** परीक्षेस येतेवेळी ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची रंगीत छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

७.४ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट प्रतीमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

७.५ नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**८. परीक्षेस प्रवेश**

**८.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

८.२ स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

८.३ आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**९. बायोमॅट्रिक पडताळणी :**

९.१ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी **(Genuineness)** डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

९.२ बायोमॅट्रिक पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांच्या बोटांचे ठसे योग्यरित्या स्वीकारले गेले असल्याची खात्री करावी.

९.३ बायोमॅट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी नाकारली जावू शकते. तसेच पडताळणीच्यावेळी उमेदवार अस्सल नसल्याचे **(not genuine)** आढळून आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवू शकते, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधाची कारवाई होवू शकते.

९.४ परीक्षेच्यावेळी बायोमॅट्रिक पडताळणीकरीता अडचण निर्माण होवून परीक्षेस प्रवेश नाकारला जावू नये, याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरीता परीक्षेच्या दिवशी उमेदवाराने हातावर मेहंदी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तू/पदार्थ लावू नये.

९.५ उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षा / मुलाखतीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

१०. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षेची योजना**" विभागातील '**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब परीक्षेची परीक्षा योजना**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

११. प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१२. सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२०

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.